# पु.ल. आणि पुढची पिढी

**डॉ. गौतम पंगू (न्यू जर्सी)**

सकाळपासून बाहेर सतत बर्फ पडत असतो. इथं हिवाळ्यातल्या बर्फवृष्टीचं कौतुक दरवर्षी पहिल्या एकदोन वेळा टिकतं, पण नंतरनंतर बर्फ पडत असला की घरात अडकून बसणं, बर्फ थांबल्यावर गाडी आणि ड्राईव्ह-वे साफ करणं, न वितळलेला बर्फ रस्त्यात तसाच दिवसेंदिवस साठून राहणं या प्रकारांचा वैतागच यायला लागतो. यावेळीही तेच झालेलं असतं. बाहेरची स्मशानशांतता, सूर्यानं मारलेली दडी, ते कुंद वातावरण...सगळं अगदी नकोनकोसं झालेलं असतं. मनावर प्रचंड मरगळ आलेली असते. काही न करता एखादं पुस्तक वाचत लोळत पडायची इच्छा होते. बुकशेल्फमध्ये नजर टाकल्यावर भारतातून आणलेली आणि अजून एक पानही न वाचलेली बरीच पुस्तकं डोळ्यांना दिसतात. पण शेवटी हात जातो 'व्यक्ती आणि वल्ली', 'असा मी असामी' किंवा अशाच एखाद्या पुस्तकाकडे. मधूनच कुठलंही पान उघडून चालायला सुरुवात केली तरी आणि आधी असंख्य पारायणं झालेली असली तरी चेहऱ्यावर हसू फुलायला वेळ लागत नाही. धोंडोपंतांची पार्ल्याच्या मावशीकडची सहकुटुंब फेरी किंवा नामू परटाचा इरसालपणा वगैरे वाचताना आपोआप हास्यस्फोट व्हायला लागतात आणि मघाचं मनावरचं मळभ कुठल्या कुठं पळून जातं. हसण्याचा आवाज ऐकून खोलीत आलेली चार वर्षांची मुलगी विचारते, " बाबा, व्हाय आर यू लाफिंग सो मच? टेल मी व्हॉट्स इन द बुक." मराठीतल्या आम्हांला भरभरून देणाऱ्या एका अत्यंत लाडक्या लेखकाच्या हातातल्या पुस्तकाकडं आणि जिनं मराठी बोलावं म्हणून आम्हांला खास प्रयत्न करावे लागतात अशा माझ्या परदेशात वाढणाऱ्या मुलीकडं आळीपाळीनं पहात मी क्षणभर विचारात पडतो.

यावर्षी पु.लं.च्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्यावर बरंच लिहिलं जातंय. त्यांच्या साहित्याचं कोणत्याही प्रकारचं मूल्यमापन करणं वगैरे या लेखाचा अजिबातच उद्देश नाही. ती माझी क्षमताही नाही. माझी पिढी, म्हणजे आता चाळिशीला पोचत असलेली पिढी, खरं तर पु.लं. च्या कारकिर्दीच्या संधीकालात वाढली. पण तरीही त्यांच्या पुस्तकांनी, नाटकांनी, संगीतानं आमच्यावर केलेलं जबरदस्त गारुड त्यांच्या मृत्यूला अठरा वर्षं झाली तरी अजूनही ओसरायला तयार नाही. त्यांच्या लिखाणातले संदर्भ रोजच्या जगण्याचा एक भाग बनून गेलेत. आजही ऑफिसमध्ये प्रत्येक गोष्टीला विरोध करणाऱ्या अमेरिकन कलीगला आम्ही मराठी लोक आपसांत 'नागूतात्या आढ्ये ' म्हणतो, मुलीला गोष्ट सांगताना वाक्याचा शेवटचा शब्द मी चितळे मास्तरांसारखा तिच्याकडून वदवून घेतो. इथल्या मराठी मंडळांच्या कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवकगिरी करणारा माणूस 'नारायण' म्हणूनच ओळखला जातो. 'तुम्हांला कोण व्हायचंय: पुणेकर, मुंबईकर की नागपूरकर?' या लेखाच्या ठिकाणं बदलून अनेक आवृत्त्या निघत असतात… ही यादी फार मोठी आहे. पु. ल. आमच्या पिढीला असाच आनंद देत रहाणार आहेत आणि म्हणूनच 'पु.लं. नंतर काय?' हा प्रश्न मला थोड्याशा वेगळ्या स्वरूपात पडतो: पुढच्या पिढीला, विशेषतः परदेशात वाढणाऱ्या पुढच्या पिढीला, पु.लं. ची

किंवा एकूणच मराठी साहित्याची ओळख कशी होणार? आणि याला जोडून पडणारा उपप्रश्न; ती ओळख होणं खरंच गरजेचं आहे का?

आम्हां परदेशात राहणाऱ्या भारतीयांची मन:स्थिती तशी थोडी विचित्रच असते. आपण इथंच राहायचं की भारतात परत जायचं हे अवघड समीकरण प्रत्येकानं बऱ्याच बेरजावजाबाक्या करून सोडवलेलं असतं. पण या गणिताच्या पलीकडं मनाला जाणवणारी खंत, टोचणारं अपराधीपण संपूर्णपणे मिटत नाही. भारतात सुट्टीवर गेल्यावर झपाट्यानं होणारे बदल नजरेला जाणवत असतात, पण मन अजूनही रेंगाळत असतं आपण पहिल्यांदा सोडून आलो त्याच वेळच्या भारतात! मग परदेशात आपल्या मुलांना वाढवताना त्यांना आपल्या संस्कृतीची, ज्या गोष्टींनी आपल्याला मोठं होताना खूप आनंद दिला आणि आपल्या जडणघडणीत महत्वाची भूमिका बजावली त्यांची ओळख व्हावी अशी इच्छा साहजिकच होते. पण इथल्या मोकळ्या, व्यक्तिस्वातंत्र्याला महत्व देणाऱ्या वातावरणात कुठल्याही गोष्टीची मुलांवर सक्ती करून उपयोग नसतो. शिवाय आजूबाजूला फक्त इंग्रजी बोलली जात असताना त्यांना मराठी बोलायची सवय कशी लावायची? यासाठी आईबाबांनी घरी एकमेकांशी आणि मुलांशी मराठीत बोलणे हा उपाय असतो. शिवाय सध्या अमेरिकेतली मराठी लोकांची संख्या पुष्कळच वाढली आहे, इथले मराठी लोक एकत्र येऊन सण साजरे करतात, बरेच कार्यक्रम करतात, काही शहरांतून मराठी शिकवणाऱ्या शाळा उघडल्या गेल्या आहेत, त्यामुळं यासाठी अन्य काही पर्यायही उपलब्ध आहेत. पण तरी हा प्रश्न उरतोच की थोडंफार लिहिणंवाचणं ठीक आहे, पण त्यापुढं जाऊन पु.लं. सारख्या मराठीतल्या अजोड साहित्यिकांची आणि त्यांच्या साहित्याची ओळख या पिढीला कशी करून द्यायची?

मुलांना मराठी वाचायला शिकवलं आणि त्यांना मराठी वाचनाची गोडी लावता आली तर उत्तमच. पण यासंदर्भात अमेरिकेतल्या 'सेकंड जनरेशन' मराठी मुलांना मराठीची ओळख करून देणारे विविध उपक्रम राबवणाऱ्या काही व्यक्तींशी चर्चा केली असता असं दिसून आलं की मराठी साहित्यकृती मुलांना ऐकवणे आणि त्यांच्याकडून त्या 'बोलवून' घेणे, हा मार्ग अधिक यशस्वी ठरतो. त्याला संगीताची जोड दिली तर अजूनच उत्तम. आम्ही बरेचदा गाडीत पु.लं च्या mp3 ऐकतो तेव्हा आमची मुलगी काहीवेळा 'काय ऐकताय?' म्हणून विचारते आणि तिला समजावलं की ती समजावून घेण्याचा प्रयत्न करतेदेखील. पु. लं. च्या लेखनाचं वैशिष्ट्य हे आहे की त्यातले संदर्भ बदलले असले तरी ज्या प्रवृत्तींवर त्यांनी विनोद केले त्या स्थलकालनिरपेक्ष आणि चिरंतन आहेत आणि त्यांनी ज्यांच्यावर विनोद केले तेही हसत हसत त्याचा आस्वाद घेऊ शकतात. त्यामुळं त्यांचा विनोद आजही ताजा वाटतो. एकदाही चाळीत न राहता आम्ही 'बटाट्याच्या चाळी'चा आनंद घेऊ शकतो तसाच तो आमची पुढची पिढीही घेऊ शकेल याचा विश्वास वाटतो. शिवाय अजून एक चांगली गोष्ट म्हणजे अमेरिकेत मागची काही वर्षं 'मराठी बालरंगभूमी' चा जन्म होऊ घातलाय. पु.लं. नी लिहिलेली 'वयं मोठ्ठं खोटम' किंवा 'नवे गोकुळ' सारखी सुंदर बालनाट्यं असोत, अन्य मराठी लेखकांनी लिहिलेली नाटकं असोत किंवा मराठी साहित्यावर आधारित अन्य कार्यक्रम असोत, ते सादर करण्यासाठी लहान मुलं एकत्र येतात, तालमी करतात, त्यांच्या मराठी ओळींचा अर्थ समजावून घेतात. व्हर्जिनिया, पिट्सबर्ग इथं

मागच्या काही वर्षांत झालेल्या अशा कार्यक्रमांना प्रेक्षकांचाही चांगला प्रतिसाद मिळालाय. मराठी साहित्याच्या आवडीचं बीज महाराष्ट्रापासून दूर वाढणाऱ्या मुलांमध्ये पेरण्यासाठी हा मार्ग निश्चितच अतिशय प्रभावी आहे!

आणि असे प्रयत्न करूनही समजा पुढच्या पिढीला मराठी साहित्याची आवड निर्माण झालीच नाही तर? याबद्दल खुद्द पु.लं.नीच १९८७ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या न्यू जर्सीतल्या अधिवेशनात सुंदर विचार मांडले आहेत. संस्कृती ही व्यवहाराबरोबर बदलणारी गोष्ट आहे हे त्यांच्या भाषणात सांगून ते म्हणतात की परदेशात वाढणाऱ्या आपल्या पिढीला समजा मराठी साहित्य नाही आवडलं पण अन्य भाषांतल्या उत्तमोत्तम साहित्याची आवड निर्माण झाली तरी चांगलंच आहे. मराठी भावगीतं किंवा हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत यांच्याशी त्यांचं सख्य नाही जमलं, पण बीथोवन आणि बाख आपलेसे वाटले तरी उत्तम आहे. कारण साहित्य, संगीत किंवा अन्य कला यांमध्ये आपली आवड पुढच्या पिढीवर लादण्यापेक्षा त्यातल्या चिरंतन, अभिजात गोष्टींची रुची त्यांना निर्माण कशी होईल हे बघणं अधिक महत्वाचं!

पु.लं. चा विनोद कुणाला दुखावणारा नव्हता, तर सगळ्यांना एकत्र आणणारा होता. त्यांच्या कलेचा प्रत्येक आविष्कार लोकांना भरभरून आनंद देण्यासाठी झालेला होता. मिळालेला प्रचंड पैसा त्यांनी फारसा गाजावाजा न करता सामाजिक कार्यासाठी दान केला. कुणालाही हेवा वाटावा अशी लोकप्रियता मिळालेल्या या माणसानं ही लोकप्रियता शेवटपर्यंत कधी डोक्यात जाऊ दिली नाही. सध्याच्या चिडक्या, दुभंगलेल्या, स्वार्थी, जवळ घेण्यापेक्षा वार करण्यातच धन्यता मानणाऱ्या, अर्ध्या हळकुंडानं पिवळं होणाऱ्या जगात मुलांना वाढवताना आदर्श म्हणून कुणाकडं बोट दाखवायचं असा बरेचदा प्रश्न पडतो. अशावेळी पु. ल. हे 'जगणं सुंदर आणि अर्थपूर्ण कसं करावं?' हे दाखवणारा किती उत्तम आदर्श ठरतात! म्हणूनच त्यांच्या साहित्य आणि कलेच्या पलीकडं जाऊन 'हा असा एक अफाट माणूस या जगात होऊन गेला' अशी त्यांची किमान ओळख जरी आपण पुढच्या पिढीला करून देऊ शकलो, तरी पु.लं. ची स्मरणज्योत आपल्याला आणि पुढच्या पिढयांना  आयुष्यात नेहमी योग्य मार्ग दाखवत राहील. हेही नसे थोडके, नाही का?

***